**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ११४/२०२२** **निशाणी क्र. ३१/क**

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास शपथेवर सुरू**

**पुढील उलटतपास वि.प.तर्फे विधीज्ञ श्री. रूईकर वकिल.**

८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये ३-४ वेळा माझे पती कसे वागत होते याबाबतचे वर्णन नमुद केले आहे व त्यामध्ये तारीख, वार, साल, वेळ नमुद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती बाहेरख्याली स्वभावाचे आहेत याबाबत मी काहीही तपशील दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वि.प.ने कोठे बाहेरख्यालीपणा केला याबाबत माझे अर्जामध्ये शपथपत्रामध्ये नमुद नाही. मी बाळासाहेब हातगणे यांना साक्षीदार म्हणून तपासणार नाही कारण सध्या ते मयत आहेत. बाळासाहेब हातगणे यांनी माझे पतीविरूध्द फौजदारी केस केल्याबाबत माझे ऐकण्यात नाही. माझ्या अर्जामध्ये वि.प.यांनी बाळासाहेब हातगणे यांना त्रास दिला होता हा मजकूर नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, वि.प.ने बाळासाहेब हातगणे यांना दिलेला त्रास मला दिलेल्या त्रासामध्ये येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बांधकामाचे काय नुकसान झाले याचा तपशील मी दिलेला नाही तसेच अर्ज, फौजदारी त्याविरूध्द केलेली नाही. कपिल कमते हे माझे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कपिल कमते यांनी माझ्या मुलाला जो त्रास दिला तो या अर्जाखाली येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे मुलाची कपिल कमते विरूध्द काही तक्रार नाही. मी कपिल कमते विरूध्द माझ्या मुलाला त्रास देतो म्हणून कोठेही तक्रार केलेली नाही. माझे आईने कपील कमते यांचेविरूध्द तक्रार केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईने कपिल कमते यांच्या विरूध्द केलेली तक्रार या अर्जाखाली येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे अर्जामध्ये पान क्र. २ ते ४ मध्ये वि.प.च्या विरूध्द जे आरोपी आहेत ते वरवरचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जामध्ये मी वि.प.विरूध्द आरोपी केलेले आहेत ते प्रस्तुतच्या कौटूबिक हिंसाचारा अंतर्गत यावे म्हणून केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या अर्जामध्ये व अंतरीम अर्जामध्ये माझे दागिने वि.प.यांचेकडे आहेत याबाबत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व दागिने माझेकडे आहेत म्हणून मी तक्रार केली नाही. मी दागिने गहाण ठेवलेबाबतचे कागदपत्रे हजर केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला दागिने गहाण ठेवताना जे पैसे ते पैसे मी चेक ने घेतले. हे म्हणणे खरे आहे की,

दि.१३/०९/२०२४ ते आजपर्यंत मी ५,८७,०००/- मी पतसंस्थेतून उचलले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या पैश्याचे काय केले त्याचा हिशोब दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या पैश्याचे हिशोबाच्या नोंदीचे पुरवणी शपथपत्र मी घातलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला शपथपत्र घालायला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर कोर्टापासून लपवून ठेवण्यास मला काही अडचण नव्हती.

९. कागदपत्रामध्ये मी माझ्या नावाच्या घराचा कागद हजर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला स्वताःला घरभाडे दयावे लागत नाही. ज्या घराचा कागद मी दाखल केलेला आहे त्याच घरात मी राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या उत्पन्नाचे शपथपत्रामध्ये घरभाडे कोणाला दयावे लागते याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा दुधाचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, विक्रमसिंग घाटगे बॅकेतून १८ लाख रूपये कर्ज काढले त्याचा हिशोब शपथपत्रात अगर कागदपत्रात कोठेही नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी विक्रमसिंग घाटगे बॅकेच्या ज्या दोन नोटीसा दाखल केलेल्या आहेत त्या प्रशांत महादेव पाटील यांच्या नावाच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोन्ही नोटीसावर माझे नाव सहकर्जदार म्हणून आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रक्कम प्रशांत पाटील हेच फेडतात. मी कर्ज फेडल्याबाबतच्या पावत्या मी या कामात दाखल करू शकते.

१०. मी ८ लाख रूपये घर खरेदीसाठी कसे आले याचा हिशोब दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण पावत्या सन २०२४-२५ च्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२४ च्या आगोदरच्या कोणत्याही पावत्या या कामी हजर नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या सोने तारण पावत्यावर रिनीवलची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, जवाहर कारखाना, गुरूदत्त कारखाना आणि व्यंकटेश्वर कारखाना यांचेमार्फत ऊसाची बीले येतात. हे म्हणणे खरे आहे की, १८,३०,६६८/- रूपये हे जून २०१३ पासून दि. १७/०३/२०२५ पर्यंत माझे खातेवर बाहेरून आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये मी १९ लाख रूपये कर्ज काढले असे नमुद केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ पासून माझे खातेवर ४६,१७,६८६/- रूपये हे पोटगीद्वारे, ऊसबील रक्कमेतून, आणि इतर लोकांच्याकडून आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला वि.प.च्या भावाकडून ही ८० हजार रूपये माझ्या खात्यामध्ये आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे निरनिराळया

मार्गाने आलेली रक्कम ही माझेकडे शिल्लक आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रामध्ये दरमहा ५ हजार रूपये उत्पन्न सन २००३ पासून आहे असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००३ पासून माझे वार्षिक उत्पन्न ६० हजार रूपये असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व घरखर्च नव-यासहीत मी करते याबाबतचा तपशील मी दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, चार लोकांच्या कुटूंबाचा घरखर्च, औषधपाणी, जेवन इ.खर्च दरमहा ५ हजार प्रमाणे भागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ पासून खर्च बंद करण्याचे काही खास कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ पासून ते सन २०२१ पर्यंत घरातील खर्च हा वि.प.करीत होता. मला किसान सन्मान निधीचे पैसे येतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे एकाच बॅकेत खाते नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे दुस-या बॅकेचे खाते मुद्दाम नमुद केले नाही. मी दुस-या बॅकेचे खाते हजर करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दुसरे खाते हजर केले नाही कारण लाडक्या बहिणीचे पैसे खात्यावर आहेत. साक्षीदार सांगते की, लाडक्या बहिणीचे पैसे पोष्टाच्या खात्यावर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, लाडक्या बहिणीचे पैसे तसेच किसान सन्मान योजनेचे पैसे मला मिळतात याबाबत मी शपथपत्रात काहीही दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुलीच्या शाळेच्या पावत्या मी याकामी दाखल केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीच्या शाळेच्या फी चा तपशील मुळ अर्जात व माझ्या शपथपत्रामध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, ऊसबीलाचे पैसे मी मिळकत घेण्यापूर्वीपासून माझे खात्यावर जमा होतात. ज्या मला शेत विकले आहे त्यांची साक्ष मी याकामी घेणार नाही. कपिल व माझे दुकान एकमेकाला लागून होते. साक्षीदार सांगते आता नाही.

<u>उभयंताच्या तोंडी विनंतीने उलटतपास तहकुब.</u>

साक्षीदारास त्याची न्यायालयासमक्ष नोंदविलेली साक्ष वाचून दाखविली व त्याने ती त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविल्याचे मान्य केले.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- १९/०८/२०२५.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.